राज्य शासनाकडील विंधण विहिर व वायुसंपिडक सुरुंग योजना जिल्हा परिषदांकडे हस्तांतरीत करण्यात आल्यामुळे, हा कार्यक्रम राबविण्यासाठी राज्य शासनाकडील पदे रद्द करुन तेवढीच पदे जिल्हा परिषदेच्या आस्थापनेवर निर्माण करण्याबाबत

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग.**
**शासन निर्णय क्रमांक ग्रापापु १०००/प्र.क्र. १०७ (२)/ पापु-०७**
**मंत्रालय, मुंबई ४०००३२, दिनांक १४ नोव्हेंबर, २०००**

**वाचा:** शासन अधिसूचना पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांक ग्रापापु १०००/ प्र.क्र. १०७ (१) / पापु-०७ दिनांक १४ नोव्हेंबर, २०००

**प्रस्तावना :**

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ च्या कलम १०० अन्वये राज्य शासनाकडील **" विंधन विहिर खोदाई कार्यक्रम"** व **"वायुसंपिडक सुरुंग योजना" हे** विषय संदर्भीय शासन अधिसूचनेव्दारे जिल्हा परिषदेकडे हस्तांतरीत करण्यात आले आहेत. या कार्यक्रम राबविणे जिल्हा परिषदांना शक्य व्हावे म्हणून राज्य शासनाकडील हा कार्यक्रम राबविण्यासाठी भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेच्या आस्थापनेवर निर्माण केलेली गट "ब" "क" "ड" संवर्गातील पदे रद्द करुन तेवढीच पदे जिल्हा परिषदांच्या आस्थापनेवर निर्माण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

शासन अधिसूचना पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांक ग्रापापु १०००/ प्र.क्र. १०७ (१) पापु-०७. दिनांक १४.११.२००० अन्वये राज्य शासनाकडील **" विंधण विहिर कार्यक्रम " व " वायुसंपिडक सुरुंग योजना "** हे विषय जिल्हा परिषदांकडे हस्तांतरीत करण्यात आले आहेत. त्यामुळे राज्य स्तरावर भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेच्या आस्थापनेवर अतिरिक्त ठरलेली सोबतच्या **परिशिष्ट-१** मध्ये नमूद केलेली एकूण ८०० पदे रद्द करण्यात येत आहेत.

२. शासन अधिसूचना पाणी, पुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांक ग्रापापु १०००/प्र.क्र.१०७/पापु-०७, दिनांक १४.११.२००० अन्वये राज्य शासनाकडील **" विंधण विहिर कार्यक्रम " व " वायुसंपिडक सुरुंग योजना "** हे विषय जिल्हा परिषदांकडे हस्तांतरीत करण्यात आले आहेत. जिल्हा परिषदेकडे सोपविलेली कर्तव्ये आणि कार्ये पार पाडणे शक्य



३६९

व्हावे यासाठी सोबतच्या **परिशिष्ट-२** मध्ये नमूद केल्यानुसार गट ब मधील तसेच गट क, व ड मधील एकूण ८०० पदे जिल्हा परिषदेच्या आस्थापनेवर निर्माण करण्यास शासन मंजुरी देत आहे.

३. या पदांवरील मार्च २००१ पर्यंतचा वेतन व भत्यावरील खर्च यासाठी सन २०००-२००१ च्या अर्थसंकल्पात करण्यात आलेल्या लेखा शिर्षाखालील तरतूदीमधून भागविण्यात यावा.

४. सन २००१-२००२ पासून या ८०० पदांच्या वेतन व भत्यावरील खर्च खालील लेखाशिर्षांतर्गत करण्यात येणा-या तरतूदी मधून भागविण्यात यावा.

१) राजपत्रित अधिका-यांचे वेतन व भत्ते यावरील खर्च २२१५ पाणी पुरवठा व स्वच्छता ०१ पाणी पुरवठा , ००१ प्रशासन व संचालन, पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी विभागीय व उप विभागीय आस्थापना (२२१५ १८४३)

२) अराजपत्रित कर्मचा-यांचे वेतन व भत्ते यावरील खर्च २२१५ पाणी पुरवठा व स्वच्छता, ०१ पाणी पुरवठा, १९१ स्थानिक संस्था, नगरपालिका इत्यादीना सहाय्य (पाच) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ कलम १८३ अन्वये जिल्हा परिषदांना आस्थापना अनुदान (स्थानिक क्षेत्र) नियमित आस्थापना (२२१५ १८८१).

५. हे आदेश वित्त विभागाच्या सहमतीने त्याचे अनौपचारिक संदर्भ क्रमांक ९३१/ व्यय ३, दिनांक ४.११.२००० अन्वये निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

**(सुधीर ठाकरे)**
**उपसचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**
मा. राज्यपाल यांचे सचिव,
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा. उप मुख्य मंत्री यांचे सचिव,
मा. मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव



360

सर्व विभागीय आयुक्त
सदस्य सचिव (प्रशासन), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
सदस्य सचिव (तांत्रिक), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
महालेखापाल. महाराष्ट्र-१ मुंबई (लेखा परिक्षा /लेखा व अनुज्ञेयता)
महालेखापाल, महाराष्ट्र २ नागपूर (लेखा परिक्षा /लेखा व अनुज्ञेयता)
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
मुख्य लेखा परिक्षक. स्थानिक निधी लेखा. नवी मुंबई
सर्व उपमुख्य लेखापरीक्षक स्थानिक निधी लेखा
सर्व प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
सर्व अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ,
सर्व जिल्हा पाणीपुरवठा अधिकारी,
सर्व कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ,
सर्व कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद
संचालक , भूजल सर्वेक्षणआणि विकास यंत्रणा, पुणे.
सर्व प्रादेशिक उपसंचालक , भूजल सर्वेक्षणआणि विकास यंत्रणा,
सर्व जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक , भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा,
नियोजन विभाग, मंत्रालय मुंबई
वित्त विभाग. मंत्रालय. मुंबई
नियोजन विभाग. मंत्रालय. मुंबई.
ग्रामविकास विभाग. मंत्रालय. मुंबई
मंत्रालयातील सर्व विभाग
पाणीपुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने
निवडनस्ती, पापु-०७.

# परिशिष्ट-१

**शा.नि.पा.पु.व स्व वि.क्र.ग्रापापु १०००/प्र.क्र. १०७/ पापु०७ दि. १०.२००० चे सहपत्र.**

| अ. क्र. | पदनाम | पदसंख्या | गट | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | उपअभियंता (यांत्रिकी) | २९ | ब | ८०००-१३,५०० |
| २ | सहाय्यक भूवैज्ञानिक | ३३ | ब | ७५००-१२,००० |
| ३ | कनिष्ठ भूवैगानिक | ६६ | ब | ६५००-१०,५०० |
| ४ | कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) | ९१ | क | ५५००-९००० |
| ५ | यांत्रिकी | २९ | क | ४०००-६००० |
| ६ | वरिष्ठ लिपिक | २९ | क | ४०००-६००० |
| ७ | सहाय्यक आवदेक | ३३ | क | ४०००-६००० |
| ८ | वायु संपिडक चालक | १५४ | क | ३२००-४९०० |
| ९ | जॅक हॅमर ड्रिलर | १२५ | क | ३२००-४९०० |
| १० | रिगमन | ३३ | क | ३२००-४९०० |
| ११ | कनिष्ठ लिपिक | २९ | क | ३०५०-४५९० |
| १२ | वाहनचालक | ६२ | क | ३०५०-४५९० |
| १३ | शिपाई | २९ | ड | २५५०-३२०० |
| १४ | मदतनीस | ५८ | ड | २५५०-३२०० |
| | एकूण | ८०० | | |

## परिशिष्ट-२

| अ.क्र. | जिल्हा | उप अभियंता यांत्रिकी ८०००-१३५०० | कनिष्ठ अभियंता यांत्रिकी ५५००-९००० | सहाय्यक आवेदक ४०००-६००० | वायुसंपिडक चालक ३२००-४९०० | यांत्रिकी ४०००-६००० | जॅक हॅमर ड्रिलर ३०५०-४५९० | रिगमन ३२००-४९०० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १. | ठाणे | १ | ३ | १ | ३ | १ | २ | १ |
| २. | रायगड | १ | ३ | १ | २ | १ | १ | १ |
| ३. | रत्नागिरी | १ | ३ | १ | २ | १ | १ | १ |
| ४. | सिंधुदूर्ग | १ | ३ | १ | २ | १ | १ | १ |
| | कोकण विभाग | ४ | १२ | ४ | ९ | ४ | ५ | ४ |
| ५. | नाशिक | १ | ३ | १ | ७ | १ | ६ | १ |
| ६. | धुळे | १ | ३ | १ | ६ | १ | ५ | १ |
| ७. | नंदुरबार | ० | १ | १ | ० | ० | ० | १ |
| ८. | जळगाव | १ | ३ | १ | ६ | १ | ५ | १ |
| ९. | अहमदनगर | १ | ३ | १ | ७ | १ | ६ | १ |
| | नाशिक विभाग | ४ | १३ | ५ | २६ | ४ | २२ | ५ |
| १०. | पुणे | १ | ३ | १ | ७ | १ | ६ | १ |
| ११. | सातारा | १ | ३ | १ | ७ | १ | ६ | १ |
| १२. | सांगली | १ | ३ | १ | ६ | १ | ५ | १ |
| १३. | सोलापूर | १ | ३ | १ | ८ | १ | ७ | १ |
| १४. | कोल्हापूर | १ | ३ | १ | ५ | १ | ४ | १ |
| | पुणे विभाग | ५ | १५ | ५ | ३३ | ५ | २८ | ५ |
| १५. | औरंगाबाद | १ | ३ | १ | ६ | १ | ५ | १ |
| १६. | जालना | १ | ३ | १ | ४ | १ | ३ | १ |
| १७. | परभणी | १ | ३ | १ | ६ | १ | ५ | १ |
| १८. | हिंगोली | ० | १ | १ | ० | ० | ० | १ |
| १९. | बीड | १ | ३ | १ | ७ | १ | ६ | १ |
| २०. | नांदेड | १ | ३ | १ | ६ | १ | ५ | १ |
| २१. | उस्मानाबाद | १ | ३ | १ | ६ | १ | ५ | १ |
| २२. | लातूर | १ | ३ | १ | ६ | १ | ५ | १ |
| | औरंगाबाद विभाग | ७ | २२ | ८ | ४१ | ७ | ३४ | ८ |
| २३. | बुलढाणा | १ | ३ | १ | ६ | १ | ५ | १ |
| २४. | अकोला | १ | ३ | १ | ६ | १ | ५ | १ |
| २५. | वाशिम | ० | १ | १ | ० | ० | ० | १ |
| २६. | अमरावती | १ | ३ | १ | ६ | १ | ५ | १ |
| २७. | यवतमाळ | १ | ३ | १ | ७ | १ | ६ | १ |
| | अमरावती विभाग | ४ | १३ | ५ | २५ | ४ | २१ | ५ |
| २८. | वर्धा | १ | ३ | १ | ५ | १ | ४ | १ |
| २९. | नागपूर | १ | ३ | १ | ६ | १ | ५ | १ |
| ३०. | भंडारा | १ | ३ | १ | ३ | १ | २ | १ |
| ३१. | गोंदिया | ० | १ | १ | ० | ० | ० | १ |
| ३२. | चंद्रपूर | १ | ३ | १ | ३ | १ | २ | १ |
| ३३. | गडचिरोली | १ | ३ | १ | ३ | १ | २ | १ |
| ३४. | नागपूर विभाग | ५ | १६ | ६ | २० | -- | १५ | ६ |



303